ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख १४ सप्टेंबर, १९६० | अंक ३६

## विविध माहिती

**द्वारका येथें संस्कृत अॅकेडेमी** — संस्कृतचे विद्वान् व भारतीय संस्कृतीच्या गाढ्या अभ्यासकांची एक बैठक राजकोट येथें भरली होती. द्वारका येथें संस्कृतच्या अध्ययन-अध्यापनासाठी एक अॅकेडमी स्थापन करण्याचा निर्णय बैठकींत घेण्यांत आला. त्याशिवाय भारताच्या संस्कृतीचें दर्शन घडविणारें एक पुराणवस्तु संग्रहालयाहि स्थापन करण्याचें ठरलें.

**ऑल इंडिआ मेडिकल सर्व्हिस** — ब्रिटिश राज्य असतांना भारतांत इंडिअन मेडिकल सर्व्हिसची योजना होती. स्वातंत्र्यानंतर ती बंद झाली. आतां अशाच पद्धतीची ऑल इंडिआ मेडिकल सर्व्हिस सुरू करण्याचा मध्यवर्ती सरकारचा विचार आहे. ह्या बाबतींत सर्व राज्य-सरकारांना विचारणा करण्यांत आली आहे.

**राजकोट विभागांतील रस्ते** — गुजरात सरकारच्या सार्वजनिक बांधकाम खात्यानें राजकोट विभागांत नवे रस्ते बांधण्याचें ठरविलें आहे. निरनिराळ्या रस्त्यांच्या १९० योजना आंखण्यांत आल्या आहेत. त्या पूर्ण करण्यासाठी सुमारें ५ कोटी रुपये लागतील. कामें पुरी होण्यास २ ते ३ वर्षे लागतील.

**विमानवाहक बोटीचा तळ** — भारताच्या नाविक दलानें ब्रिटनकडून एक विमानवाहक बोट विकत घेण्याचें ठरविलें आहे. बोट १९६१ च्या मध्याच्या सुमारास मिळेल. ह्या बोटीचा नेहमींचा तळ म्हणून कोचीन बंदराची निवड करण्यांत आली आहे.

**पंजाबच्या सचिवालयाला दुरुस्त्या** — १८ महिन्यांपूर्वी पंजाब सरकारच्या सचिवालयासाठी १·७४ कोटी रुपये खर्चून नवी अद्यावत् इमारत बांधण्यांत आली. ह्या इमारतीला दुरुस्त्या करण्याचा प्रसंग आला आहे. कांहीं ठिकाणीं काँक्रीटच्या तुळयांना तडे गेले आहेत. इमारत बांधतांनाच कांहीं दोष राहून गेले आहेत असें एंजिनिअर्सचें मत आहे.

**हॉलंडमध्यें त्वचेचा रोग** — हॉलंडमधील सार्वजनिक आरोग्यखात्यानें मार्गारिन ह्या कृत्रिम लोण्याचे ५० लाख पुडे नष्ट करून टाकण्याचा हुकूम दिला आहे. पुडे तयार करणाऱ्या कारखान्यानें एक प्रकारचा रंग लोण्यांत मिसळला. त्यामुळें सुमारें १ लाख लोकांना त्वचेचा रोग झाला आहे.

**पुरुषांवरील शस्त्रक्रिया लोकप्रिय** — अहमदनगर जिल्ह्यांत संतति थांबविण्यासाठी पुरुषांवर शस्त्रक्रिया करण्याचे कॅंप्स चार पांच ठिकाणीं उघडण्यांत आले होते. सुमारें ६५० शेतकऱ्यांनीं ह्या संधीचा फायदा घेऊन शस्त्रक्रिया करून घेतली. आतां पुन्हा असेच कॅंप्स उघडण्यांत येणार आहेत. आणखी २,००० पुरुष शस्त्रक्रिया करून घेतील, असा अंदाज आहे.

**६० टन वजनाचा उपग्रह** — रशिआचे पंतप्रधान मि. क्रुश्चॉव्ह फिनलंडला भेट देण्यासाठी गेले असतां विजेच्या उपकरणांचा कारखाना पाहण्यास गेले होते. त्या वेळीं एका कामगाराशीं बोलतांना त्यांनीं असें सांगितलें की लवकरच रशिआ ६० टन वजनाचा उपग्रह अंतरिक्षांत सोडणार आहे.

**मुक्त व्यापारविभागाची व्याप्ति** — कांडला बंदर सल्लागार मंडळाची बैठक भुज येथें भरली होती. कांडला बंदराभोंवती जो मुक्त व्यापारविभाग निर्माण करण्यांत यावयाचा आहे, त्याची व्याप्ति १,००० एकरांची असावी अशी शिफारस मंडळानें केली आहे.

**धर्मगुरूचा संततिनियमनाला पाठिंबा** — डॉ. गिन् सायमन नांवाच्या एका ब्रिटिश धर्मगुरूनें संततिनियमनाला पाठिंबा दिला आहे. ज्या घटनांना निसर्गाचे नियम म्हणतात त्यांच्याबद्दल ख्रिस्ती धर्मांतहि मतांतरें झालेलीं आहेत ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे असेंहि ते म्हणाले. ज्या मुलांच्या शिक्षणाची व इतर सोय होऊं शकत नाहीं, त्यांना जन्म देणें योग्य आहे काय? असा सवाल त्यांनीं केला.

**एअर इंडिआची नवी कचेरी** — एअर इंडिआ इंटर नॅशनल ह्या कंपनीने आपली एक कचेरी अहमदाबादमध्यें उघडली आहे. गुजरातचें स्वतंत्र राज्य झाल्यावर अहमदाबादचें औद्योगिक महत्त्व वाढत चालल्यानें तेथील लोकांची विमानप्रवासाची अधिक चांगली सोय करण्याच्या दृष्टीनें हा उपक्रम करण्यांत आला आहे.

**रशिअन शास्त्रज्ञांना शाबासकी** — रशिअन शास्त्रज्ञांनीं ४॥ टन वजनाचें एक रॉकेट अंतराळांत सोडून त्यामधील जिवंत प्राणी असलेली पेटी परत पृथ्वीवर आणण्यांत यश मिळविलें. प्राध्यापक लोवेल ह्या ब्रिटिश शास्त्रज्ञानें ह्या कामगिरीचा गौरव केला आहे. रशिआ माणसासहित रॉकेट सोडून त्याला परत आणण्याच्या अगदीं जवळ असल्याचें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे.

**सोलापूरचा पाणीपुरवठा** — सोलापूर शहराला हुटगी तलावामधून दररोज १५ लाख गॅलन पाणी पुरविण्यांत येतें. पण पावसाच्या अभावामुळें तलावांतील पाण्याचा सांठा कमी झाल्यामुळें पाण्याचा पुरवठा कमी करण्यांत आला आहे. भीमा नदी-योजना पूर्ण झाल्यावर शहराचा पाणीपुरवठ्याचा प्रश्न सुटेल.

**विमानतळांची सुधारणा** — तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत मुंबई, दिल्ली व कलकत्ता येथील विमानतळांत मोठ्या प्रमाणावर सुधारणा करण्यांत येणार आहेत. ह्या कामासाठी ४·५ कोटी रुपये खर्च करण्यांत येतील. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ह्याच कामासाठी ८ कोटींवर रुपये खर्च करण्यांत आले आहेत.

**टाटा कंपनीच्या कामगारांना बोनस**—टाटा आयर्न अँड स्टील कंपनी व कामगार ह्यांच्यांत बोनससाठी दीर्घकाल वाटाघाटी चालू होत्या. त्या यशस्वी होऊन कामगारांना १९५९-६० सालचा म्हणून १·२ लाख रुपये बोनस वाटण्यांत येणार आहे. बोनसच्या रकमेपैकी २५ टक्के हिस्सा कंपनी आपल्याजवळ ठेवणार असून त्याचा वाटवडा पावसाळ्यांत करण्यांत येईल.

**स्वस्त मोटारगाडी**—छोट्या व स्वस्त मोटारगाड्यांच्या उत्पादनाच्या सार्वजनिक मालकीचा एक कारखाना काढण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. मोटारींची किंमत ६,५०० रुपयांच्या आसपास असेल. मोटारींच्या बनावटीचा तपशील ठरविण्यासाठी एक कमिटी नेमण्यांत आली आहे.

**बोलपटाच्या धंद्याला उत्तेजन**—गुजरात राज्य सरकारनें राज्यांतील बोलपटाच्या धंद्याला उत्तेजन देण्याचें ठरविलें आहे उत्तम दर्जाचे गुजराती चित्रपट काढणाऱ्या निर्मात्याला स्टुडिओ. साठी जमीन, पाणी व इतर सवलती देण्यास सरकार तयार आहे.

**कोळशाच्या खाणींवरील कामगार**—भारतामधील कोळशाच्या खाणी कंत्राटी पद्धतीनें चालविल्या जातात. त्यामुळें कामगारवर्गांत एक प्रकारचें अस्थैर्य निर्माण होतें. कोळशाच्या खाणींत काम करणाऱ्या कामगारांबाबत ही पद्धत बंद करतां येईल काय, हें पाहण्यासाठी चौकशी करण्याचें सरकारनें ठरविलें आहे.

**कच्छला पाण्याचा पुरवठा !**—नर्मदा नदी योजनेच्या दुसऱ्या टप्प्यांत नर्मदेचें पाणी कच्छमधील शेतीला पुरविणें कितपत शक्य होईल त्याची पाहणी करण्यांत येत आहे. योजनेच्या पहिल्या टप्प्याला ४३ कोटी रुपये व दुसऱ्या टप्प्याला ५० कोटी रुपये खर्च येणार आहे. पहिल्या टप्प्याची प्राथमिक पाहणी पूर्ण झाली आहे.

**रशिआला सीलोनचें गिऱ्हाईक**—सीलोनच्या सरकारनें आयात होणाऱ्या तेलावर गॅलनमागें ४० सेंट आयात कर बसविला व त्यांतील कांहीं भाग आयात कंपन्यांनीं सोसावा अशी तेल कंपन्यांना विनंती केली. त्यांनीं ती मानल्यामुळें सीलोन रशिआकडून तेल आयात करण्याच्या खटपटींत आहे. सीलोनमधील आयातकंपन्या व भारतामधील आयात कंपन्या एकच आहेत.

**गंडक नदी योजना**—बिहारमधील गंडक नदी योजना चांगल्या रीतीनें पार पाडतां यावी म्हणून एक बोर्ड स्थापन करण्यांत येणार आहे. ह्या योजनेसाठी नेपाळ व भारत ह्यांच्या दरम्यान करार करण्यांत आलेला आहे. योजना पूर्ण झाल्यावर २८ लाख एकर जमिनीला पाणी मिळेल व १५ हजार किलोवॅट वीज तयार होऊं शकेल.


श्री. वा. काळे ह्यांच्या पुस्तकांचे गुजराती अनुवाद

| सुखी जीवननी पगदंडी | सदाचारने पगले | मधुमालती |
|---|---|---|
| ( तिसरी आवृत्ति ) | ( दुसरी आवृत्ति ) | ( छापत आहे ) |
| [ कण आणि क्षण ] | [ पुढे पाऊल ] | [ तुमचें स्थान कोणतें ] |

महाराष्ट्रांतील लहानमोठ्या उद्योगधंद्यांची आर्थिक अडचण तत्परतेनें दूर करून
महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासास संपूर्ण साह्य करणारी

( शिड्यूल्ड बँक ) **दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें** ( स्थापना १९३६ )

मुख्य ऑफिस :—प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, थोरले बाजीराव रस्ता, पुणें २. ( फोन नं. ६५६३ )
मुंबई शाखा :—८१ मेडोज स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १. ( फोन नं. २५३४०८ )

: संचालक मंडळ :

श्री. छोटालाल धरमसी जोशी ( प्रोप्रायटर–कमलाकांत छोटालाल अँड को. ( इम्पोर्टर्स, एक्स्पोर्टर्स मुंबई ) अध्यक्ष.
श्री. गणेश उद्धव चितळे ( सुपरिंटेंडेंट, पैसाफंड कांच कारखाना ) उपाध्यक्ष.
श्री. गणेश रामचंद्र साठे ( डायरेक्टर, साठे बिस्किट अँड चाकोलेट कं. लि. पुणें )
श्री. चिंतामण त्रिंबक चितळे ( ऑ. सेक्रेटरी, पैसाफंड ग्लास वर्क्स, तळेगांव )
श्री. वासुदेव पांडुरंग वैद्य ( इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल इंजिनियर )
श्री. विनयकुमार नारायण सरदेसाई ( मॅ. डायरेक्टर, एशियाटिक इंडस्ट्रिअल एजन्सीज लि. मुंबई )
श्री. सदाशिव कृष्णाजी भागवत ( प्रोप्रायटर, राम एजन्सी ) पुणें.
श्री. मोहनलाल हंसराज लुनावत ( व्यापारी ) पुणें.

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★
मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाच्या नवीन योजनेबाबत समक्ष भेटा.
—बी. वाय्. पाठक, अॅ. मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. १४ सप्टेंबर, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रिझर्व्ह बँकेचा गेल्या वर्षाचा आढावा

### परिस्थिति आटोक्यांत ठेवण्याचे प्रयत्न

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मध्यवर्ती बोर्ड ऑफ डायरेक्टरांचा ३० जून, १९६० असेरचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. " औद्योगिक उत्पादनाच्या गतींत बरीच वाढ, शेतीच्या उत्पादनांत थोडीशी घट, एकूण गुंतवणुकींत किंचितशी भर, किंमतीच्या पातळींत आणखी बरीचशी वाढ, पैशाचा पुरवठा आणि बँकांचीं कर्जे ह्यांच्या विस्ताराच्या गतींत वाढ, स्टॉक मार्केटमधील चलतीचें वातावरण आणि परदेशी शिलकांत आणखी घट " असें गेल्या वर्षातील हिंदी आर्थिक परिस्थितीचें थोडक्यांत वर्णन करतां येईल.

किंमतवाढ चिंताजनक झाली. घाऊक किंमतीच्या निर्देशांकांत गेल्या वर्षी ६.३% वाढ होऊन तो १२२.९ वर गेला. (१९५२–५३ = १००); १९५८–५९ मधील वाढ २.०% होती. ह्या किंमतवाढीस औद्योगिक कच्चा माल आणि तयार माल ह्यांच्या वाढत्या किंमतींनीं बराच हातभार १९५९–६० मध्यें, १९५१ नंतर प्रथमच, लावला; अन्नधान्यांच्या १९५८–५९ मधील समाधानकारक उत्पादनामुळें (७.३५ कोटी टन) आणि वाढत्या आयातीमुळें (४२.२ लक्ष टन) त्यांचा बाजारभाव फारसा वाढला नाहीं. १९५९–६० मधील शेतीच्या उत्पादनांत घट झालेली आढळते; विशेषतः कपास आणि ताग; कांहीं प्रमाणांत अन्नधान्यें. आयात केलेल्या औद्योगिक कच्च्या मालाच्या पुरवठ्यांत वाढ, अंतर्गत मागणींत सुधारणा आणि नव्या कारखान्यांच्या उत्पादनास प्रारंभ, ह्यामुळें १९५९ मध्यें औद्योगिक उत्पादनांत वाढ झाली, तरी कच्च्या मालाच्या वाढत जाणाऱ्या किंमती आणि वेतनवाढीसाठी कामगारांच्या वाढत्या निकडीच्या मागण्या ह्यामुळें निर्गतीवर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव आहे.

जनतेच्या हातांतील पैशाचा पुरवठा १७२ कोटी रुपयांनीं (६.८%) वाढला; त्यापूर्वीच्या वर्षातील वाढ १५१ कोटी रु. (६.४%) होती. सरकारला रिझर्व्ह बँकेनें पुरविलेल्या पैशामुळें चलनवाढीस साहाय्य झालें; पण पूर्वीच्या वर्षांच्या मानानें सरकारला कमी नोटा पुरविण्यांत आल्या होत्या. खाजगी क्षेत्राला बँकांनीं अधिक प्रमाणांत कर्जे दिलीं. शेड्यूल्ड बँकांचा कर्जपुरवठा १३९ कोटी रु. नीं वाढला; त्यापूर्वीच्या वर्षी तो फक्त ८२ कोटी रु. नीं वाढला होता. ठेवींत मात्र साधारणतः तितकीच म्हणजे सुमारें २३० कोटी रु. नीं वाढ झाली. बँकांच्या डिमांड देण्यांत ३४ कोटी रु. नीं वाढ झाली; त्यापूर्वीच्या वर्षी ती ७ कोटी रु. नीं झाली होती. पी. एल. ४८० आयातीमुळें निर्माण झालेल्या ठेवींचा डिमांड देण्यांत पूर्वीप्रमाणें मोठ्या भरणा होता. १२ मे, १९६० पासून हे फंड स्टेट बँकेऐवजीं रिझर्व्ह बँकेंत ठेवण्यांत येऊं लागले आहेत. शेड्यूल्ड बँकांची सरकारी रोख्यांतील गुंतवणूक १०४ कोटी रु. नीं वाढली; पूर्वीच्या वर्षी ती १४९ कोटी रु. नीं वाढली होती.

पंचवार्षिक योजनेवर १९५७–५८ मध्यें ८८२ कोटी रु. खर्च झाला होता; १९५९–६० मध्यें तो १,००६ कोटी रु. झाला. तरीसुद्धां त्याचा फारसा ताण जाणवला नाहीं. त्याचें श्रेय मुख्यतः परदेशी मुबलक साहाय्यालाच दिलें पाहिजे. करवसुलींतहि सुधारणा दिसून आली. मध्यवर्ती व राज्य सरकारांच्या अंदाजपत्रकांतील तूट १९५७–५८ मध्यें ४९६ कोटी रु. होती, ती १९६० मध्यें ११३ कोटी रु. वर आली.

१९५६–५७ मध्यें परदेशी देण्या-घेण्यांत २३० कोटी रु. ची तूट अनुभवास आली होती; १९५७–५८ मध्यें ही तूट २३५ कोटी रु. भरली; १९५८–५९ मध्यें ती १५ कोटी रु. आणि १९५९–६० मध्यें ३० कोटी रु. झाली. आयातींत (मुख्यतः सरकारी) घट आणि निर्गतीच्या मिळकतींत थोडी वाढ, ह्याचा हा परिणाम आहे. परदेशी मदतीमध्यें खूपच वाढ झाली आहे.

रिझर्व्ह बँकेनें शेड्यूल्ड बँकांच्या येण्या-देण्यांवरील निर्बंध वाढवून पतपुरवठ्याच्या नियोजनाचा प्रयत्न केला. त्याचा कांहीं प्रमाणांत सुपरिणाम दिसून आला. त्यामुळें मात्र रिझर्व्ह बँकेकडून त्यांनीं घेतलेल्या कर्जांत पूर्वीइतकी घट झाली नाहीं आणि सरकारी रोख्यांतील त्यांची गुंतवणूक पुरेशी वाढली नाहीं. पुढच्या मोसमांत ताण न पडतां कर्जे देतां यावींत, ह्यासाठी आतांच बँकांनीं कर्जपुरवठा आखडून धरण्याची आवश्यकता रिझर्व्ह बँकेनें प्रतिपादन केली आहे.

अहवालाचे वर्षी रिझर्व्ह बँकेनें ७१ शेड्यूल्ड आणि २३८ बिगर–शेड्यूल्ड बँकांची, त्याचप्रमाणें २५६ सहकारी बँकांची, १४४ मोठ्या आकाराच्या सहकारी पतपेढ्यांची व २ केंद्रीय विणकर सोसायट्यांची तपासणी केली. शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांत २५९ ची भर पडून त्यांची संख्या ४,०६० झाली. नव्या शाखांपैकीं ८७ शाखा जेथें पूर्वी कोणतीच बँक–कचेरी नव्हती, अशा ठिकाणीं उघडण्यांत आल्या.

रिझर्व्ह बँकेला गतवर्षी ४७.५७ कोटी रु. उत्पन्न झालें; खर्च ७.५७ कोटी रु. झाला आणि मध्यवर्ती सरकारकडे वर्ग करण्यासाठी ४०.०० कोटी रु. उपलब्ध झाले. अहवालाचे वर्षी १० कोटी रु. बँकेच्या नॅशनल ॲग्रि. क्रेडिट (लाँग टर्म ऑपरेशन्स) फंडांत घालण्यांत आले; ह्यापूर्वी ५ कोटी रु. दरसाल त्या फंडांत घालण्यांत येत असत. नॅशनल ॲग्रि. क्रेडिट (स्टॅबिलायझेशन) फंडांत पूर्वीप्रमाणेंच १ कोटी रु. घातले गेले.

---

**साखरेसाठी बाजारपेठ**—अमेरिकेनें राजकीय कारणांवरून क्यूबाकडून घेण्यांत येणाऱ्या साखरेंत कपात केली आहे. ह्या परिस्थितीचा फायदा भारताला घेतां येईल, असें सुचविण्यांत येत आहे. साखरेच्या गेल्या हंगामांत उत्पादन वाढलें असल्यामुळें भारताला अमेरिकेला साखर पुरविता येईल अशी अपेक्षा आहे.

## पुणें सें. को. बँक लि.

आदल्या सालीं संकल्प केल्याप्रमाणें बँकेनें अहवालाचे वर्षी लोणावळ्या येथें रामनवमीचे सुमुहूर्तावर दि. ५ एप्रिल, १९६० रोजीं बँकेची शाखा उघडली. या शाखेचें उद्घाटन त्यावेळच्या मुंबई राज्याचे बांधकाममंत्री ना. बाळासाहेब देसाई यांचे हस्तें झालें. तसेंच सदर वर्षी बँकेनें दि. ७ जून, १९६० रोजीं देहूरोड येथें एक उपशाखा सुरू केली आणि २७ जून, १९६० पासून बेल्हें येथें 'पे ऑफिस' उघडलें. या दोन्हींचें उद्घाटन बँकेच्या अध्यक्षांनीं केलें. अशा रीतीनें अहवालाचे सालीं बँकेचा कारभार मुख्य कचेरीशिवाय १५ शाखा, ७ उपशाखा आणि २ पे ऑफिसें यांचेमार्फत चालू होता. बँकेच्या अधिकृत रु. २५ लाखांच्या भाग-भांडवलापैकी ३०-६-६० अखेर वसूल भाग-भांडवल रु. २४,८७,४७० आहे. त्यामध्यें मुंबई राज्य सहकारी बँकेनें घेतलेलें भाग भांडवल रु. १० लाख इतकें आहे. भागांची संख्या वर्षा-अखेरीस मर्यादित राहिल्यानें ते फक्त नवीन सोसायट्यांकरितांच उपलब्ध ठेवले होते. गतवर्षी सोसायट्यांकडील थकबाकीचें प्रमाण १८·२ टक्के होतें. पण चालू वर्षी ते १२·३ टक्के आहे. ३०-६-६० अखेर बँकेचे व्यक्तिगत सभासद ५,५०२ आहेत. त्यांपैकी पुणें शहरांतील ४,१३३; पुणें शहर सोडून जिल्ह्यांतील १,२४६ व मयत १२३ आहेत. बँकेस जोडलेल्या सहकारी सोसायट्या १,१६२ आहेत.

चालू वर्षी शेतकी सोसायट्यांचे संख्येंत झालेली वाढ स्पृहणीय आहे. आतांपर्यंत बँकेचे इतिहासांत एका वर्षात एवढी वाढ झाल्याचें दुसरें उदाहरण नाहीं.

अहवाल सालांत शेतीकर्जासाठी रु. ८४ लाख रिझर्व बँकेनें मंजूर केले होते. सदरहू कर्जांत ७० लाखांची उचल अहवालसालीं केली आहे. मध्यम मुदतीकरतां मंजूर असलेल्या रु. ८,००,००० कर्जांतून रु. दीड लाखांची उचल बँकेनें १९५८-५९ सालीं केली होती. त्यापैकी रु. ५०,००० चा पहिला हप्ता बँकेनें यंदाचे सालीं दि. २३-११-५९ ला परत केला आहे.

माळेगांव व सणसर या पुणें जिल्ह्यांतील दोनहि सहकारी साखर कारखान्यांनीं यंदा हंगामभर गळीत चालू ठेवलें होतें. दि. ३०-६-६० अखेर या दोन्ही कारखान्यांकडील वेगवेगळ्या क्रेडिट्सची बाकी रु. ७०,३८,०४४·९३ नये पैसे आहे.

निरनिराळ्या प्रकारच्या कर्जांची दि. ३०-६-६० अखेरची एकूण येणेंबाकी रु. १२,७९,७३२ आहे. बँकेनें घराचे तारणावर कर्ज देण्याचें बंद केलें आहे. इतर वैयक्तिक कर्जांतहि क्रमशः कपात करण्याचें बँकेचें धोरण आहे. परंतु चालू सालीं शेतमालाचे तारणावर व्यक्तिशः सभासदांना जादा कर्ज मंजूर केल्यामुळें कर्जांत कांहींशी वाढ झालेली दिसत आहे. ३०-६-६० अखेर वैयक्तिक कर्जांची थकबाकी रु. ३,५७,०८७ आहे. थकबाकीचें शेंकडा प्रमाण २७·२८ पडतें.

अहवाल सालीं बँकेस निव्वळ नफा रु. ३,२३,८०३·९३ इतका झाला आहे.

गेल्या तीन वर्षांची शेतीकर्जांची आंकडेवारी माहितीसाठी खालीं दिली आहे.

| साल | आरंभीं येणें रु. | कर्ज दिलें रु. | कर्ज वसूल रु. | अखेर येणें बाकी रु. | थकबाकी रु. | थकबाकीचें शें. प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५७-५८ | ८७,३८,२२१ | ८४,३२,७१० | ७४,२४,५५८ | ९७,४६,३६३ | १५,१०,३३२ | १५·६ |
| १९५८-५९ | ९७,४६,३६३ | १,१५,६५,९३० | ९५,३७,९८० | १,१७,७४.३१३ | २१,५०,६५५ | १८·२ |
| १९५९-६० | १,१६,७४,३१३ | २,२५,०४,३०९ | १,५०,६१,७०६ | १,९२,१६,९१६ | २३,७७,६३७ | १२·३ |

गेल्या आठ वर्षांप्रमाणें बटाटा-कर्ज योजना यंदाहि समाधानकारक रीतीनें पार पडली. सोसायटयांनीं तालुका व जिल्हा संघांमार्फत दरसालप्रमाणें बियाणें व खत घेतलें. या कर्जाची मंजुरी व उचल यांचा तपशील खालीलप्रमाणें आहे.

| | सोसायट्या | सभासद | क्षेत्र एकर | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| बँकेची मंजुरी | १४७ | ५,४८५ | ५,८४१ | ४७,५३,६०० |
| प्रत्यक्ष उचल | १५५ | ४,९१६ | ५,१७१ | ३६,१३,४४९ |

गेल्या तीन वर्षांची बटाटाकर्जयोजनेच्या व्यवहाराची आंकडेवारी खालीलप्रमाणें आहे.

| साल | आरंभीं येणें रु. | कर्ज दिलें रु. | कर्ज वसूल रु. | येणें बाकी रु. | थकबाकी रु. | थकबाकीचें शेंकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५७-५८ | १०,६२,६३८ | १२,१२,६०३ | १३,३४,११६ | ९,४२,१२५ | २,२२,५८२ | २३·५ |
| १९५८-५९ | ९,४२,१२६ | २०,५७,९८६ | १७,३४,४२९ | १२,६५,६८२ | ९२,४५७ | ७·३ |
| १९५९-६० | १२,६५,६८२ | ४१,२३,६७८ | २५,९३,८८० | २७,९५,४८० | ४४,०४० | १·५ |


## तुमचें स्थान कोणतें ?

लेखक : श्री. वा. काळे

[पृ. सं. ११० ] ◆ [ किं. २ रु.

## સુખી જીવનની પગદંડી

( ગૃહજીવનનું માંગલ્ય )

લેખક:—શ્રી. વા. કાળે, સંપાદક, "અર્થ"

ગુજરાતી બીજી આવૃત્તિ ] [ કિંમત રૂ. ૧-૮-૦

## राजस्थानच्या औद्योगिक विकासाबद्दल निवेदन

राजस्थान चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संस्थेनें तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या मसुद्याबद्दल एक निवेदन तयार केलें आहे. राजस्थानचा औद्योगिक विकास साधण्यासाठी ह्या कार्यक्रमांत काय करण्यांत यावें तें निवेदनांत सुचविण्यांत आलें आहे. औद्योगिक विकासाबाबत मुख्यतः पांच बाबींवर जोर देण्यांत आला आहे. त्या अशा:—(१) पाण्याचा पुरवठा व स्वस्त दरानें विजेचा पुरवठा. (२) वाहतुकीचीं साधनें, विशेषतः रेल्वेमार्ग तयार करून ते रुंद रुळाच्या रेल्वेमार्गाला जोडणें. (३) उद्योगधंद्यांच्या विकासाला अडथळा न आणतील अशा प्रकारचे कामगार–विषयक कायदे. (४) नव्या उद्योगधंद्यांना लागणारी यंत्रसामुग्री व कच्चा माल मिळण्याची व्यवस्था आणि (५) उद्योगधंद्यांच्या वाढीला पोषक होईल अशा प्रकारची करपद्धति. ह्या बाबी डोळ्यांपुढें ठेवून राज्य सरकारनें मदत करावी असें निवेदनांत सुचविण्यांत आलें आहे. तपशीलवार सूचना करतांना निवेदन म्हणतें कीं राजस्थानांत वीज–निर्मिती करणारीं ५ किंवा ६ केंद्रें उभारण्यांत यावीं. प्रत्येक केंद्रांत ३ लाख किलोवॅट वीज निर्माण करणारी यंत्रसामुग्री बसवावी. हें काम सरकारला करतां येण्यासारखें नसेल तर खाजगी भांडवलाला जरूर ती वीज निर्मिती करण्याची संधि देण्यांत यावी. ह्या कामांत परदेशी मदत घ्यावी लागत असेल तर तीहि घ्यावी. राजस्थानांत कोळसा नाहीं व जलविद्युत् निर्माण करण्यास वाव नाहीं. म्हणून अणुशक्तीवर वीज निर्माण करणाऱ्या केंद्रांचाहि विचार करण्यांत यावा.

## सेव्हिंग्ज खातेदारांना त्यांच्या ठेवींपैकी २५० रु. मिळणार

लोकसभेनें बँकिंग कंपन्यांत दुरुस्ती करणारें बिल मंजूर केलें आहे. त्याअन्वयें, लिक्विडेशनमध्यें गेलेल्या बँकेच्या प्रत्येक सेव्हिंग्ज खातेदाराला अग्रहक्कानें त्याच्या खात्यांतले २५० रु. किंवा त्यापेक्षा कमी असेल तर तेवढीच रक्कम मिळेल. अशा रकमा देऊन झाल्यावर, बाकीच्या ठेवीदारांना ह्याचप्रमाणें २५० रु. किंवा खात्यांत असलेली त्यापेक्षा कमी असलेली रक्कम मिळेल. बिलांतील मूळ तरतुदीप्रमाणें, बाकीच्या ठेवीदारांना त्यांच्या ठेवींच्या ५०% किंवा २५० रु., जी कमी असेल तेवढी रक्कम मिळावयाची होती. मूळ सरकारी बिलाला ही सुधारणा श्री. मोरारका ह्या सभासदानें सुचविली व ती दुरुस्ती मान्य झाली. आतां एखाद्याची ४०० रु. ची ठेव असेल, तर त्याला २५० रु. मिळूं शकतील; मूळ तरतुदीप्रमाणें त्याला २०० रु. च मिळाले असते. ठेव २५० रु. पेक्षा कमी असेल, तर सबंद ठेवीची रक्कम मिळेल.

## बँक-नोकरांचें देणें आणि लिक्विडेशनमध्यें गेलेली बँक

पलाई सेंट्रल बँक एम्प्लॉईज युनियननें कंपनी कायद्यांत कांहीं दुरुस्त्या सुचविल्या आहेत आणि त्या सत्वर घडवून आणण्याची विनंती भारत सरकारला केली आहे. बँक बंद पडल्यामुळें सुमारें ५०० नोकरांवर बेकारीचा प्रसंग आला आहे, आणि बँकेनें त्यांना पगाराची बाकी, प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅच्युइटी, रिट्रेन्चमेंट भरपाई, इत्यादींचें मिळून सुमारें १० लाख रु. देणें आहेत. कंपनी-कायद्याच्या ५३० व्या कलमाप्रमाणें, फक्त चार महिन्यांच्या साठलेल्या पगारास (कमाल रक्कम १,००० रु.) अग्रहक्क मिळतो. आपलें येणें इतर अग्रहक्काच्या येण्याप्रमाणेंच समजण्यांत यावें, असें युनियनचें म्हणणें आहे. कंपनी कायद्यांत त्यासाठी आवश्यक ती दुरुस्ती करून तिची अंमलबजावणी ८ ऑगस्ट (ज्या दिवशीं पलाई बँक लिक्विडेशनमध्यें नेण्याचा हायकोर्टानें हुकूम केला) पासून व्हावी, असेंहि युनियननें कळविलें आहे.

## विदेशी कंपन्यांच्या अधिकाऱ्यांचें हिंदीकरण

भारतांतील विदेशी कंपन्यांत १९५४ मध्यें दरमहा १,००० रु. पगारापेक्षा ज्यास्त जागीं ३,४५५ हिंदी आणि ७,००८ बिगर–हिंदी लोक होते. आतां त्यांची संख्या अनुक्रमें ७,९१६ हिंदी व ५,३०४ बिगर–हिंदी अशी झाली आहे. ह्या संबंधांतील प्रगतीचा तपशील असा :—

| | हिंदी नोकरांचें प्रमाण | |
|---|---|---|
| | १९५४ | १९५९ |
| १ ते १½ हजार रु. पगार | ५५·७% | ८८·४% |
| १,५०१ रु. ते ३,००० रु. पगार | २३·६% | ५५·४% |
| ३,००० रु. चे वर. | ६·८% | १६% |

१९६२ पर्यंत, २,००० रु. खालच्या नव्या सर्व जागीं हिंदी नोकरच नेमण्यांत येतील आणि त्यावरच्या जागीं ६०% भरती हिंदी नोकरांची होईल. असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्सनें अशा हिंदीकरणास मान्यता दिली आहे.

## मळ्यांतील मजुरांत मद्यपानाचा प्रसार

आसाम आणि पश्चिम बंगाल येथील मळ्यांतील मजुरांत मद्यपान खूपच प्रमाणावर आढळतें. ९२% पुरुष आणि ९०% स्त्रिया दारू पितात. मुलें–मुलीहि आई–वडिलांच्या समवेत दारू घेतात. दर पंधरवड्याला प्रत्येकजण सरासरीनें १·३९ रुपयांची दारू पितो. ज्यास्त मजुरी मिळविणारे ज्यास्त दारू पितात, हा समज मात्र चुकीचा आहे.

## यशस्वी प्राइझ बाँडस्

भारत सरकारच्या बक्षिसाच्या रोख्यांचे पहिल्या तिमाहीचे यशस्वी नंबर भारत सरकारच्या ३ सप्टेंबरच्या खास गॅझेटांत प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.

## राणी एलिझाबेथची भारताला भेट

राणी एलिझाबेथ भारतांत येईल, तेव्हां तिला एका राष्ट्राची प्रमुख म्हणून मान दिला जाईल; राष्ट्रकुलाची प्रमुख म्हणून नव्हे, असें पं. नेहरूंनीं जाहीर केलें आहे.

## नोटीस

"सातारा जिल्हा को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि., कराड–सांगलीची २५ वी वार्षिक साधारण सभा मंगळवार ता. २७-९-१९६० रोजीं दुपारीं ३ वाजतां सांगली येथें जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली यांचे जनरल हॉलमध्यें भरणार आहे. त्यावेळीं (१) मागील सभेचें प्रोसिडिंग वाचून कायम करणें. (२) सन १९५९-६० चा अहवाल, ताळेबंद व नफातोटापत्रकें मंजूर करून डिव्हिडंड जाहीर करणें. (३) सन १९६०-६१ चें अंदाजपत्रक तयार करणें. (४) सन १९६०-६१ सालाकरितां लोकल ऑडिटर नेमणें. (५) पोट-नियम दुरुस्ती स्वीकारणें. (६) डायरेक्टर्स यांची निवड जाहीर करणें, इत्यादि कामें आहेत. त्याच दिवशीं सकाळीं ९ ते दुपारीं १ वाजेपर्यंत मतदान होऊन दक्षिण सातारा जिल्ह्यांतील वाळवा, शिराळा पेटा व खानापूर तालुक्यांतर्फें एक डायरेक्टरचे जागेकरितां उमेदवार (१) श्री. ज्ञानू पांडुरंग पाटील रा. उरूण–इस्लामपूर, (२) श्री. केशव गोविंद कुलकर्णी रा. उरूण–इस्लामपूर यांची निवडणूक होणेची आहे."

## सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९१८] गिरगांव, मुंबई ४. [टेलि. : २७०१४

**महाराष्ट्राची अग्रेसर सहकारी बँक**

| | | | |
|---|---|---|---|
| भाग भांडवल : | ... | ... | रु. ८,५९,००० |
| रिझर्व्ह फंडस् : | ... | ... | रु. ९,७३,००० |
| ठेवी : | ... | ... | रु. १,३२,००,००० |
| खेळतें भांडवल : | ... | ... | रु. २,६७,००,००० |

शाखा : फोर्ट, दादर, वरळी, वडाळा, माहीम, पुणें, बेळगांव.

मुख्य शाखा : सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.



## हरवलें तें गवसले कां?....

हरवलेली मीना सापडली तेव्हां तिच्या आई-वडिलांच्या आनंदाला पारावारच उरला नाहीं. मुलाबाळांच्या सुखा करितां तुमची केवढी धडपड असते! पण एखादे वेळीं तुम्हीच कुटुंबाला पारखे झालांत तर—तुमच्या कुटुंबाचे भवितव्य सुरक्षित राहील काय? आयुर्विम्यामुळेंच ही सुरक्षितता लाभूं शकेल. तुम्ही हयात असा अगर नसा तुमच्या मुलाबाळासाठीं ठरविलेल्या योजना आयुर्विम्यामुळें पूर्ण होऊं शकतील. विमा अेजंट अधिक माहिती समजावून सांगेल.



**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया**

## रिक्षा चालविणाऱ्यांचें पुनरुज्जीवन

### सहकारी पद्धतीनें मिळवून दिलेली प्रतिष्ठा

वर्दळ चालू असलेला दिल्लींतील एक रस्ता आहे. त्यावरील इमारतीच्या सर्वांत वरच्या मजल्यावर एका छोट्याशा कार्यालयांत कांहीं व्यक्ति जमल्या आहेत. आपण महत्त्वपूर्ण कार्य करीत आहोंत याची त्यांना जाणीव आहे. बाहेरच्या गडबडीकडे त्यांचें लक्ष नाहीं.

ही सर्व मंडळी दिल्लींतील सायकल-रिक्षावाल्यांच्या सहकारी औद्योगिक संस्थेच्या कार्यकारी मंडळाची सदस्य आहेत. मंडळाची आज सभा असल्यानें सर्वजण कार्यालयांत जमले आहेत. संस्थेचे सदस्य होण्यासाठी रिक्षा चालविणाऱ्या बऱ्याच लोकांनीं अर्ज केले असून त्यांचा विचार करण्यासाठी मंडळाची बैठक बोलाविण्यांत आली आहे. आपण सदस्य झाल्यास चांगला लाभ मिळवितां येईल अशी अर्ज करणाऱ्यांना खात्री आहे.

पांच वर्षांपूर्वी ही संस्था सुरू करण्यांत आली. सहकारी पायावर संघटना उभारल्यामुळें कसे फायदे होऊं शकतात ह्याचें, ही अभिनव पद्धतीची संघटना म्हणजे एक उत्तम उदाहरण आहे.

### शोषित वर्ग

रिक्षा चालविणाऱ्याचें आयुष्य म्हणजे खडतर, कष्टमय. रिक्षा चालविण्याचा धंदा हा कोणी खुशाखुशी पत्करणार नाहीं आणि विशेष गोष्ट म्हणजे मानवी प्रतिष्ठेला बाध यावी असेंच या धंद्याचें स्वरूप आहे.

रिक्षा ओढण्याऐवजीं तिला यंत्रें जोडून तिची सायकल रिक्षा केल्यानें परिस्थिति सुधारली आहे. परंतु एक गोष्ट निश्चित कीं, हा वर्ग समाजांतील अत्यंत शोषित असा वर्ग आहे. रिक्षाचे परवाने धारण करणारे मालक रिक्षाचे रोजीं भाडें वसूल करतांना त्यांची कितीतरी पिळवणूक करीत असतात. दिवसाचे सारे श्रम कामीं लावल्यानंतरच मालकाचें भाडें त्याला देतां येतें आणि आपल्या व कुटुंबाच्या पोटापाण्याला कशीबशी पुरेल इतकी रक्कम त्याच्या हातीं उरते.

कांहीं वर्षांपूर्वी, दिल्लींतील सर्व रिक्षा एका गटाच्या हातीं असल्यामुळें रिक्षावाल्यांना फारच हलाखीची स्थिति आली होती. या गटानें रिक्षावाल्यांकडून रोजीं जबरदस्त भाडें घेण्याचा उपक्रम सुरू केला होता. यांतून मार्ग काढतां येईल असें कांहीं थोड्या रिक्षावाल्यांना वाटत होतें. परंतु बरेच जण आपल्या नशिबापुढें हात टेकून बसले होते.

### मार्ग सांपडला

यानंतर कांहीं राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांनीं सहकारी संघटना सुरू करण्याची कल्पना त्यांच्यापुढें ठेवली. या योजनेमुळें आपल्या परिस्थितींत सुधारणा होऊ शकेल यावर त्यांचा चटकन विश्वास बसेना. बोलविण्यांत आलेली सभा अपेशी ठरली. फारच थोडे रिक्षावाले सभेला आले होते आणि जे थोडे आले होते त्यांना आपण चालवीत असलेल्या रिक्षा एके दिवशीं आपल्या मालकीच्या होऊं शकतील हें खरेंच वाटेना.

दुसरी सभा बोलाविण्यांत आली, परंतु तीचीहि तीच गत झाली. मात्र कार्यकर्त्यांनी धीर सोडला नाहीं. तिसऱ्या खेपेस मात्र अकरा रिक्षावाल्यांनीं आपली संघटना स्थापण्याचा निश्चय केला व ५० रु. भांडवल जमविलें. दि. २२ जुलै, १९५५ रोजीं ही संस्था रजिस्टर होताच या कल्पनेचा प्रसार होऊं लागला. यावेळीं सदस्य संख्या २४ वर जाऊन संस्थेचें भांडवल ३५५ रु. झालें होतें.

आपली हलाखीची स्थिति दूर करण्यास सहकारी संघटना उभारणें हा चांगला उपाय आहे अशी रिक्षावाल्यांची खात्री पटतांच इतर अनेक अडचणींचें त्यांना कांहीं वाटेनासें झालें. संस्थेनें चालविण्यासाठी घेतलेल्या रिक्षांना परवाने मिळविणें आणि या रिक्षा विकत घेण्यासाठी पैसे उभारणे, अशासारख्या कांहीं समस्या त्यांना सोडवावयाच्या होत्या.

हळूहळू या अडचणी दूर होऊं लागल्या. रिक्षा चालविणाऱ्यांनीं स्वत: ७०० रु. उभे केले. राज्य सहकारी बँकेनें ३५,००० रुपये कर्जाऊ दिले आणि रिक्षा तयार करणाऱ्यांनीं १५,००० रुपये देऊं केले.

### सदस्यत्व, भांडवल व मालमत्ता

गेल्या पांच वर्षांत संस्थेच्या सदस्यांची संख्या ४३२ वर गेली आहे. संस्थेजवळ ६५,००० रु. किंमतीच्या १५८ सायकलरिक्षा व ७५,००० रु. किंमतीच्या १५ स्कूटररिक्षा आहेत. संस्थेचें भाग भांडवल ४०,००० रु. असून इतर मालमत्तेची किं. १०,००० रु. आहे. संस्थेचें स्वतंत्र कार्यालय असून त्यावर महिना ८०० रु. खर्च केला जातो. वाहनांची दुरुस्ती व सफाई करण्यासाठी संस्थेचें स्वत:चें वर्कशॉपाहि आहे.

संस्थेच्या प्रत्येक शेअरची किंमत १०० रु. आहे. संस्थेचा सदस्य होणारा रिक्षावाला शेअरची किंमत म्हणून सुरुवातीस १० रु. देतो. उरलेली रक्कम रोजीं ५० नये पैसे या हप्त्यानें भरली जाते. दिलेल्या रकमेपैकी रिक्षाच्या दुरुस्तीसाठी कांहीं रक्कम रिक्षेवाल्याला परत केली जाते.

संस्थेचा सदस्य प्रत्येक आठ तासासाठी पांच आणे या दरानें संस्थेची रिक्षा भाड्यानें नेऊन वापरूं शकतो. (संस्था स्थापन होण्यापूर्वी रिक्षा चालविणारें मालकांना रोजीं ६ ते ७ रु. भाडें देत असत.) स्कूटर रिक्षांना चांगलें भाडें मिळत असल्यानें त्यांचें रोजीं भाडें ८ ते १० रुपये घेतलें जातें. रोजच्या दुरुस्तीचीं कामें सदस्य स्वत:च करतात परंतु वर्षांतून होणारी रिक्षांची संपूर्ण तपासणी, दुरुस्ती व तेलपाणी संस्था स्वत:च्या खर्चानें करते. संस्था आपल्या रिक्षा ड्रायव्हर्सना वर्षांतून दोन गणवेष पुरविते. स्कूटर रिक्षांच्या विम्याचे हप्ते संस्थाच भरते.

संस्थेच्या सदस्यांना वैद्यकीय मदत व त्यांच्या मुलाबाळांना शैक्षणिक सोयी मिळवून दिल्या जातात. संस्थेच्या सदस्यांच्या मुलांनीं पुस्तकें खरेदी केल्यास संस्था कांहीं खर्च स्वत: सोसतें.

### अधिक चांगलें जीवन जगण्याची इच्छा

हलाखीची स्थिति, दारिद्र्य आणि पिळणूक या घातचक्रांतून अपेक्षिल्याप्रमाणें रिक्षावाल्यांची आतां सुटका होऊं लागली असल्यानें आपलें जीवन अधिक सुखी कसें होईल या दृष्टीनें ते मार्ग शोधण्याचा प्रयत्न करीत आहेत. संस्थेच्या दोन सदस्यांजवळ स्कूटर घेण्याइतके पैसे जमतांच त्यांनी त्या विकत घेतल्या आणि कांहीं सदस्यांनीं सायकलरिक्षाऐवजीं आतां स्कूटर रिक्षा चालविण्यास प्रारंभ केला आहे. बऱ्याच सदस्यांनीं आतां बँकेंत खातीं उघडलीं असून कांहींजण चांगल्या घरांत राहण्यास जाण्याच्या प्रयत्नांत आहेत.

लल्लूसिंग हा या संस्थेचा पहिला अध्यक्ष. एकवेळ भाड्यानें रिक्षा घेऊन आपली उपजीविका करीत असे. आज त्याचे बँकेंत २,००० रु. शिल्लक आहेत. संस्थेचें रोजचें भाडें दिल्यानंतर महिनाअखेरीस त्याचें उत्पन्न १५० रु. वर जातें. यामुळें त्याच्या कुटुंबांतली मंडळी आतां चांगल्या प्रकारचें जीवन जगूं लागली

आहेत. भविष्यकाळांत तो स्कूटर रिक्षा चालवूं लागेल आणि जमुना बझारमधील गलिच्छ जागेंतून चांगल्या जागीं रहावयास जाईल.

लल्लूर्सिंगाप्रमाणेंच जगन्नाथ ( स्थलांतरित ) या रिक्षावाल्यानेंहि बँकेंत पैसे जमविले आहेत. सायकलरिक्षा सोडून त्यानें स्कूटर चालवावयास प्रारंभ केला आणि स्कूटर त्यानें संस्थेकडून मिळविली आहे. त्याचें उत्पन्न दरमहा २५० रु. आहे. आपल्या बहिणींचीं लग्नें करून दिल्यानंतर आज तो स्वतः लग्न करण्याच्या विचारांत आहे.

संस्थेचा दुसरा एक सदस्य नंदकिशोर हाहि स्थलांतरित असून त्यानें संस्थेकडून स्कूटर चालवावयास घेतली आहे. सध्यां तो आपल्या लग्नासाठीं पैसे जमवीत असून त्याचें उत्पन्न दरमहा २५० रु. आहे. दोन वर्षांपूर्वीं तो सायकलरिक्षा चालवीत असे.

### यापुढील कार्य

सदहू सहकारी संस्थेला सार्वजनिक कार्यकर्ते, सरकारी, तसेंच बिनसरकारी व्यक्ति, यांजकडून चांगलें साहाय्य व उत्तेजन मिळत असून संस्थेचें सदस्यत्व मिळविण्यासाठी सध्या पटावर १०० लोकांची नांवें आहेत. आपल्या सदस्यांना अधिकाधिक लाभ मिळवून देण्याच्या दृष्टीनें संस्थेचे प्रयत्न सारखे चालू आहेत. स्कूटर रिक्षांचे सुटे भाग ठेवण्यासाठी एखादें स्टोअर हाउस उभारण्याची आणि सध्यांच्या वर्कशॉपमध्यें वाढ करण्याची योजना आहे.

निवाऱ्यास जागा नसलेल्या सायकलरिक्षावाल्यांसाठी एखादें वसतिगृह उघडण्याचाहि विचार आहे. सदस्यांची नियमितपणें वैद्यकीय तपासणी करणें आणि त्यांच्यासाठी शैक्षणिक वर्ग सुरू करणें, अशाहि योजना आहेत.

इतरांनीं सहकाराची सैद्धांतिक चर्चा खुशाल करावी. दिल्ली येथील ४३२ रिक्षावाल्यांनीं आपल्या सहकारी प्रयत्नांद्वारें आपल्या व्यवसायाला प्रतिष्ठा मिळवून दिली असून आपल्यासाठी व आपल्या मुलाबाळांसाठी अधिक सुखी जीवनाची गुरुकिल्ली मिळविली आहे.

---

### कुटुंबनियोजनासाठी तोकडी तरतूद

इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ पॉप्युलेशन स्टडीज ह्या संस्थेचे डायरेक्टर डॉ. एस्. चंद्रशेखर ह्यांनीं मुंबई येथें भारतीय विद्या-भवनांत बोलतांना अशी तक्रार केली आहे कीं तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कुटुंबनियोजनासाठी करण्यांत आलेली ४० कोटी रुपयांची तरतूद फारच तोकडी आहे. ह्या रकमेच्या कितीतरी पट अधिक रक्कम देण्यांत आली तरी पंचवार्षिक कार्यक्रमांच्या यशाच्या दृष्टीनें ती परवडेल असें त्यांचें म्हणणें आहे. ह्याविषयीं पुढें बोलतांना ते म्हणाले कीं गेल्या दहा वर्षांत देशांतील मालाचें उत्पादन व सुखसोयींची उपलब्धता वाढलेली आहे. तरीसुद्धां लोकांच्या जीवनांत ह्या गोष्टींचा उपभोग फारसा वाढलेला दिसत नाहीं. ह्याचें कारण लोकसंख्येची झपाट्यानें होणारी वाढ. भारतांत कुटुंबनियोजनाच्या नेहमींच्या पद्धती यशस्वी झालेल्या नाहींत, म्हणून शस्त्रक्रियेची पद्धतच येथें उपयोगी पडेल. ह्या उपायानें प्रजोत्पादनक्षमता कायमची नाहींशी होते असा आक्षेप घेण्यांत येतो. पण मुंबई येथें व परदेशीं ह्या बाबतींत जे प्रयोग करण्यांत आले आहेत त्यावरून पुरुषांची प्रजोत्पादनशक्ति पुन्हा परत आणतां येते असें सिद्ध झालें आहे. दर हजारीं ५० जोडप्यांनीं जरी शस्त्रक्रिया करून घेतली तरी सध्यांचे जननाचें दर हजारी प्रमाण निमपटीनें कमी होईल. सध्या दरहजारी ४२ असें जननाचें प्रमाण आहे. दोन किंवा जास्तींत जास्त तीन मुलें झाल्यावर तरुण जोडप्यांनीं शस्त्रक्रिया करून घेतल्यास तें फारच परिणामकारक ठरेल.


## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा
(४) श्रीरामपूर (५) ओझर ( जि. नाशिक )
(६) खोपोली ( जि. कुलाबा ).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१९५ |
| रिझर्व्हज् | रु. १,३८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८५,००,०००चे वर |

★रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर
B. A., LL. B.
मॅनेजर

## भोर स्टेट बँक लि.

( स्थापना १९४४ )

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.
शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ९१,००० |

मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याज वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१-६२ पासोड्या विठोबा नजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष
रावसाहेब य. द. खोले
श्री. गो. बा. देवी
श्री. बा. ग. धंद्रुके


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास ' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.